**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८३०/२००७**

**१) सौ.सुरजीबाई गुरुप्रसाद उपाध्ये**
**संतोषी माता मंदीर हनुमान बस्ती,**
**अकोला. अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक**
**अधीक्षक , भूमी अभिलेख कार्यालय, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, अकोला. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३१.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ती यांचे पती हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "अकोला महानगर पालीका गट नं. २५ मधील नझुल शीट नं. ३८ सी प्लॅाट नं. २ क्षेत्रफळ १२७६ चौ.फुट चे बाबत आपणांस दि. १.१.९९ पासून नमूना ड मागणीसाठी प्राप्त झालेल्या सर्व अर्जांच्या प्रतिलीपी त्याप्रमाणे दिलेल्या ड नमूना ड चे प्रतिलिपीसह.

(२) दि. १.११.२००० नंतर आपण घेतलेल्या फेर फार साठी प्राप्त झालेले अर्ज व त्याप्रमाणे घेतलेल्या फेर फारसाठी प्राप्त झालेले सर्व दस्तऐवजाच्या प्रतिलीपी

(३) याशिवाय काही लोकांनी दि. १.१.२००० नंतर फेर फार नोंदविण्यास घेतलेले आक्षेपपत्रांच्या प्रतिलीपी. सदर आक्षेप व जिल्हा न्यायालयाचे मनाई हुकूम असतांना आपण सदरहू नोंदी कोणत्या नियमाप्रमाणे घेतल्या याबाबतचा आपला अभिप्राय सविस्तर खुलाशासह देण्यात यावा."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांनी दिनांक २९.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांना "आपण जिल्हाधिकारी कार्यालयाचे परिसतील सेतू कार्यालयामध्ये नियमानुसार नक्कल फी भरणा करुन प्रतिलीपी प्राप्त करुन घेता येतील. फेर फार क्रमांक २३०९, २३१०, दिनांक १.१.२००० नंतर या कार्यालयास दिनांक २८.५.२००३ ला नोंदी करीता प्लॅाट नंबर २, शिट नंबर ३८ सी मधील जागेवर नोंदी घेणेबाबत अर्ज प्राप्त झाला होता. ती नोंद घेण्याबध्दल कोणाचाही आक्षेप मुदतीत किंवा नंतर प्राप्त झाला नाही. तसेच जिल्हा न्यायालयाकडून कोणताही मनाई हुकूम या कार्यालयास प्राप्त झाला नाही. व नोंदी महाराष्ट्र जमीन महसुल १९६६ चे कलम १५० नुसार घेतलेल्या आहेत. " असे कळविलेले दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व अधीक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा दाखल करताना दिनांक ८.११.२००६ ला अपीलार्थी हे सुनावणीस हजर झाले नाही, हजर न झाल्यामुळे अपील प्रकरणात निर्णय देण्यात आलेला नाही, असे नमूद केले आहे. परंतु दिनांक २७.१०.२००६ रोजी जे अधीक्षक, भूमी अभिलेख यांना पाठविलेल्या नोटीशीवर दिनांक ८.११.२००६ रोजी अपीलकर्ता हजर आहे व पुढील तारीख १३.१२.२००६ रोजी दिलेली आहे अशी नोंद दिसून येते. व त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीकरीता कगदपत्रे दाखल करण्याकरीता दिनांक २०.६.२००८ ही तारीख देण्यात आली होती. त्याप्रमाणे अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी १ ते ७ अशी सहपत्रे दाखल केली आहेत. परंतु सहपत्रामध्ये मागितलेल्या माहितीच्या कागदपत्राच्या प्रती २ प्रतीत सादर केलेल्या आहेत, असे नमूद केले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी खुलासा

दाखल केला आहे व खुलाशामध्ये मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही, असे त्यांनी नमूद केले आहे.

अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ११.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक २९.८.२००६ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याचे अवलोकन केले असता माहिती ही उपलब्ध करुन देण्याऐवजी टाळाटाळ केलेली दिसून येते. व सेतू कार्यालयामध्ये माहिती उपलब्ध होईल असे कळविलेले दिसून येते. वास्तविक, अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.९९ पासून नमूना ड मागणीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या प्रतिलीपी व नमूना ड दिनांक १.१.२००० नंतर घेतलेल्या फेर फार अर्जावरील दस्तऐवजाच्या प्रतीलीपी व त्याबाबत घेतलेल्या आक्षेपाची प्रतिलीपी इ. माहिती मागितलेली आहे. परंतु छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु कोणत्याही प्रकारची कागदपत्रे किंवा फेर फार नोंदीकरीता आलेल्या अर्जाच्या प्रतीलिपी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या नाही व प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी न घेता अपीलकर्ता हजर असताना त्यांना पुढील तारीख दिलेली असताना ते गैरहजर होते असा दिशाभूल करणारा खुलासा आयोगाकडे सादर केला आहे व त्यावरुन सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे, अशी आयोगाची खात्री झालेली आहे. आयोगाच्या कार्यालयात मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या प्रती दाखल करुन नये असे नोटीशीत स्पष्टपणे दिलेले असले तरी जन माहिती अधिकारी यांनी फेर फार पंजीची नक्कल दाखल केलेली दिसून येते. आयोगाने माहिती मागितलेली नसते व आयोग हा पोस्टमनचे काम करीत नाही व त्यामुळे आयोगाचे कार्यालयात माहिती उपलब्ध करुन देवून जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असे जर वाटत असेल तर त्यांना अधिनियमाच्या तरतूदीचे कोणतेही प्राथमिक ज्ञानसुध्दा नाही असे दिसून येते. व आजही द्वितीय अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हजर झाले नाही व कोणत्याही प्रकारचा अर्ज सुध्दा त्यांनी आयोगाकडे गैरहजर राहाण्याकरीता केलेला नाही. यावरुन सुध्दा जन माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात जाणून बुजून टाळाटाळ करीत

आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे राज्य जन माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे दोषी आढळून येतात शास्तीस पात्र आहे. जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द



शास्ती लादताना त्यांचे म्हणणे एकुण घेणे हे अधिनियमाच्या कलम २० (१) च्या परंतुकाप्रमाणे बंधनकारक आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांना सदरच्या अपीलाच्या सुनावणीस कागदपत्रे दाखल करण्याकरीता व नोटीस काढून सुनावणीस हजर राहाण्याकरीता संधी देण्यात आली होती. त्यामुळे पुन्हा त्यांचे म्हणणे ऐकुण घेण्याची संधी देण्याची आवश्यकता दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांच्या विरुध्द रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार) ची शास्ती लादण्याची संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास जाणून बुजून टाळाटाळ केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) ची शास्ती ही लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही उप संचालक, भूमी अभिलेख, अमरावती यांनी त्यांच्या दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती **"००७०-इतर प्रशासिकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार(००७०-०१६-१)"** मध्ये जमा करावी.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ११.८.२००६ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीप्रमाणे (फेर फार वगळून) छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-३१.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**